| MHNS240003112024 | **संक्षिप्त फौजदारी खटला क्र.११५/२०२४**<br>**महाराष्ट्र शासन**<br>**वि.**<br>**सचिन दादाजी पाणपाटील** |
|---|---|

**फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २५८ अन्वये निशाणी क्रमांक ०१ वरील आदेश.**

अभियोजन पक्षाने सदर खटला दिनांक ०८/०२/२०२४ रोजी दाखल केला आहे. आरोपीविरुध्द वेळोवेळी समन्स काढले. आरोपीला हजर ठेवण्यास सरकारपक्ष व पोलिस प्रशासन संधी देउनही असमर्थ ठरले आहे. आजरोजी देखील आरोपी हा गैरहजर आहे. खटला दाखल दिनांका पासून आजरोजी पर्यंत अभियोजनपक्षाला संधी देवुनही ते अद्याप आरोपीस हजर ठेवु शकले नाही. त्यामुळे सदर खटला न्यायाच्या दृष्टीने व मौल्यवान वेळेच्या दृष्टीने प्रलंबित योग्य ठरणार नाही. तसेच खटला दाखल दिनांका पासून आजरोजी पर्यंत अभियोजनपक्षाने अद्याप रासायनिक परिक्षण अहवाल अभिलेखावर सदर केलेला नाही. रासायनिक परिक्षण अहवालाशिवाय आरोपीवरील अपराध सिध्द होवू शकत नाही. सद्य परिस्थती मध्ये खटल्याचे संपरीक्षा घेतली तरी त्याचा काहीच उपयोग होणार नाही. रासायनिक परिक्षण अहवाला अभावी सदर खटला न्यायाच्या दृष्टीने व मौल्यवान वेळेच्या दृष्टीने प्रलंबित योग्य ठरणार नाही. म्हणून मी, मा. मुंबई उच्च न्यायालयाने मुलचंद मोतीलाल राका वि. महाराष्ट्र शासन १९९६/१/बॉम्बे सी.आर. ३१६ या न्याय निवाडयामध्ये नोंदविलेल्या निरीक्षणावर भरोसा ठेउन खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

# <u>आदेश</u>

१. आरोपीस महाराष्ट्र मद्यनिषेध अधिनियम, १९४९ चे कलम ६५ (ई) अन्वये दंडनिय अपराधा मधून फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २५८ अन्वये दोषमुक्त करण्यात येते व खटला थांबविण्यात येतो.

२. सदर गुन्हयामधील जप्त मुद्दे मालाची नियमानुसार विल्हेवाट लावावी.

३. अभियोजन पक्षाला आरोपीवर खटला चालवण्याची परवानगी पाहिजे असल्यास ते तशी मागणी अर्जान्वये करु शकतात. सदर परवानगीस कोणतीही बाधा असणार नाही.

SHIPKULE CHARUDATTA

Digitally signed by SHIPKULE CHARUDATTA
Date: 2026.03.11 18:03:31 +0530

**ठिकाण – सटाणा** **(चारुदत्त उध्दव शिपकुले)**

**दिनांक– १०/०३/२०२६** **प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी सटाणा.**